**सं.फौ.ख.क्र.४५२/२०२२**
शुभम नारखेडे — वि.- गोपाल
निशाणी क्रं. १९ पुढे सुरु

**फिर्यादी तर्फे साक्षदार क्रं.- १**
मी शपथपुर्वक खरे सांगतो की,
नाव - शुभम प्रल्हाद नारखेडे
वय - ३१ वर्ष, व्यवसाय - शेती
राह.- हरीकिरण सोसायटी मलकापुर ता.मलकापुर, जि. बुलढाणा.

**साक्षीदाराचा सरतपास फिर्यादी तर्फे विधीज्ञ श्री. पी. आर. नाफडे यांचे मार्फत सुरु -**

मी दाखल केलेले नि. क्रं. १९ वरील पुराव्याचे प्रतिज्ञापत्रातील मजकुर माझया सांगणेप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. मी मजकुर वाचुन त्यावर सही केली असुन तो माझा पुरावा म्हणुन वाचण्यात यावा.

आता साक्षीदाराला नि. क्रं. ४ वरील दस्त यादी खालील दस्ताऐवज दाखविण्यात आले. आता साक्षीदारास त्याने दाखल केलेला धनादेश क्रंमाक ०६४५५३ हा मला आरोपीने दिला होता. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **नि. क्रं. ४५** देण्यात येते. आता साक्षीदारास सदर धनादेश वटण्याकरीता बॅकेत जमा केल्याची पावती दाखविण्यात आली. त्यास **नि. क्रं. ४६** देण्यात येते. सदर धनादेश वठविण्याकरीता बॅकेत टाकला असता अनादर झाला असुन धनादेशाचा रिटर्न मेमो दाखल केला आहे. त्यावर बॅकेच्या अधिका-याची सही व बॅकेचा सिक्का आहे. त्यास **नि. क्रं. ४७** देण्यात येते. मी दिनांक २६.०४.२०२२ रोजी माझया वकीलामार्फत आरोपीला पाठविलेल्या सुचनापत्राची फोटो कॉपी (छायाप्रत) दाखल केली. त्यास **अर्टिकल अ** देण्यात येते. मी सदर नोटीस पाठविल्याबाबत ची पोस्टची पावती दाखल केली. त्यास **नि. क्रं. ४८** देण्यात येते. आरोपी सुचनापत्र मिळाल्याबाबतचे पोहच पावती मी दाखल केली. त्यास **नि. क्रं. ४९** देण्यात येते. आता साक्षीदाराला नि. क्रं. ४३ वरील दस्त यादी खालील दाखल केलेल मौजे भाडगणी शिवार येथील गट नं. २२३,२२४,२२५,२३१ या शेताचे सातबारा उता-याची सत्यप्रत दाखविण्यात आली. त्यास अनुक्रमे **नि. क्र. ५०,५१,५२ व ५३** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विदवान विधीज्ञ श्री. ए. डी. तांदुळकर यांच्या मार्फत सुरु.**

माझे शिक्षण एम.एस.सी. केमेस्ट्री पर्यत २०२० मध्ये मलकापुर येथे पुर्ण झाले आहे. माझे वडील अंदाजे तीन वर्षापुर्वी मयत झाले आहे. हे म्हणने खरे आहे की, माझे वडील मयत होण्यापुर्वी शेती त्यांचे नांवाने होती. हे म्हणने खरे नाही की, माझे वडील हयात असे पर्यंत शेती मशागत स्वत: करत होते. हे म्हणने खरे नाही की, माझे वडील हयात असे पर्यत शेतीचा माल खरेदी करणे व उत्पादीत शेतमालाची विक्री करण्याच काम तेच करत

होते. मी शेतीचा माल अडत्याकडे माझे नांवाने विक्री केल्याबाबतचे कागदपत्रे प्रकरणात दाखल केले नाही. माझयाकडे तशाप्रकारचे बिल उपलब्ध नाही. हे म्हणने खरे आहे की, मी सन २०२२,२०२३ या वर्षी शेतीचा माल विक्री केला होता याबाबतचे कागदोपत्री पुरावे मी सादर करु शकत नाही. माझे कडे सन २०१५ पासून ते सन २०२२ पर्यंत मी शेतीचा माल विक्री केल्याबाबतचे व त्यापासुन उत्पन्न मिळत असल्याबाबतचे कागदपत्रे माझेकडे उपलब्ध नाही. माझेकडे सन २०२० पासुन आयकर भरणा केल्याचे कागदपत्रे आहेत. मी सन २०२० च्या आयकर मध्ये आरोपीला दिलेल्या तथाकथित रक्क्मेबाबतचा उल्लेख केलेला नाही. मी माझया देवाण घेवाण या व्यवहाराची खातेवही ठेवलेली नाही. हे म्हणने खरे आहे की, मी कोणाकडुन किती रक्कम घेणे आहे व कोणाला किती रक्कम देणे आहे याबाबत नोंदी माझयाकडे ठेवलेल्या नाही. हे म्हणने खरे नाही की, माझे कडे सन २०१५ पासून ते आजपर्यंत कोणताही व्यवहार नसल्यामुळे व माझे कोणतेही उत्पन्न नसल्यामुळे मी नोंदी ठेवल्या नाही. हे म्हणने खरे आहे की, मी उच्चशिक्षीत असल्यामुळे मला व्यवहाराचे नियम माहीत होते. हे म्हणने खरे आहे की, रक्कम रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नगदी स्वरुपात व्यवहार करणे कायदयाप्रमाणे मान्य नाही. मी आरोपीकडे कोणत्या बॅन्केचे किती कर्ज आहे याबाबत आरोपीकडे व कोणत्याही बॅन्कडे आरोपीला तथाकथीत रक्कम देण्यापुर्वी चौकशी केली नाही. मी आरोपी कडे शेती आहे किवा नाही याबाबत शाहनिशा केली तसेच सातबारा पाहीला. आरोपीकडे मौजे खरबडी ता. मोताळा येथे १५ एकर शेती होती. माझया म्हणण्याप्रमाणे माझे कडे असलेल्या शेती पेक्षा जास्त शेती आरोपीकडे आहे. मी तथाकथित व्यवहारासंबंधी आरोपीकडुन उसनवार चिठठी किंवा इतर दस्त लिहुन घेतला नाही. मी आरोपीकडुन सुरक्षा म्हणून काहीही घेतले नव्हते. हे म्हणने खरे नाही की, आरोपी मला व्यक्तीक ओळखत नाही तसेच आरोपीचा व माझा परिचय नाही. हे म्हणने खरे नाही की, आरोपी माझे कडे कधी आले नाही व मी आरोपीकडे कधी गेलो नाही.

**प्रश्न :- रक्कमेवर काय व्याजदर ठरला होता.**

**उत्तर :- मी व्याजाचा व्यवसाय करत नाही.**

मी दिनांक १५.०१.२०२० रोजी माझे ६,००,०००/- नगदी रोख रक्कम उपलब्ध होती व कोणत्या स्त्रोताव्दारे ती माझे आली होती याबाबत मी माझया अर्जात व पुराव्यात उल्लेख केलेला नाही. आरोपी हा कमी शिक्षीत आहे हे मला माहीती आहे. आरोपी त्यांचे वकील श्री.एस.एस. मोरे यांचे मार्फत मला दिनांक १२.०५.२०२२ रोजी सुचनापत्राचे उत्तर दिले होते. त्या नोटीस मध्ये त्यांनी वस्तुस्थिती नमुद केली होती किंवा नाही हे मला माहीती नाही. हे म्हणने खरे आहे की, सन २०१८ मध्ये आरोपीचा मुलगा महादेव याचा आपघात झाला होता. त्याकरीता त्याला चिखली व बुलढाणा येथे उपचार घ्यावा लागला किंवा नाही हे मला माहीत नाही. मी व माझे वडील हे राजेंद्र वासुदेव पाटील यांना ओळखत नाही. हे म्हणने खरे नाही की, माझे वडील ५ टक्के व्याजाने पैसे देतात हे राजेंद्र वासुदेव पाटील यांनी आरोपीला सांगीतले होते. हे म्हणने खरे नाही की, सन २०१८ मध्ये आरोपीने राजेंद्र वासुदेव पाटील यांचे समक्ष माझे वडीलांकडुन व्याजाने ३,००,०००/- रुपये घेतले होते. हे म्हणने खरे नाही की, त्या रक्कमेवर दरमहा ५ टक्के व्यास देण्याचे ठरले होते. हे म्हणने खरे त्यावेळी माझे वडीलांनी आरोपीला पैसे देतांना प्रकरणातील केवळ सही केलेला

कोरा धनादेश हा सुरक्षा म्हणुन घेतला होता. हे म्हणने खरे नाही की, दिनांक २९.०१.२०१९ रोजी आरोपी यांनी राजेद्र वासुदेव पाटील यांचे समक्ष माझे वडीलांना मुळ रक्कम ३,००,०००/- व व्याजाची रक्कम ९०,०००/- असे मिळून एकुण ३,९०,०००/- परत दिले होते. हे म्हणने खरे नाही की, त्यावेळी आरोपीने माझे वडीलांना सुरक्षेपोटी दिलेला चेक परत मागीतला असता तो शोधावा लागेल असे माझे वडीलांनी सांगीतले. हे म्हणने खरे नाही की, असे सांगीतले होते की, तुम्ही चिंता करु नका तो चेक मी फाडुन टाकीन. हे म्हणने खरे नाही की, माझे वडीलांचे मृत्यु नंतर मी त्या धनादेशाचा दुरुपयोग करुन त्यावर स्वत: खोटा मजकुर व खोटी रक्कम नमुद करुन बॅन्केत सादर केला. हे म्हणने खरे नाही की, प्रत्यक्षात मला आरोपीकडुन एक रुपयाही कायदेशीर घेणे लागत नाही. हे म्हणने खरे नाही की, सावकारीच्या व्यवहारामध्ये सुरक्षा म्हणुन घेतलेला धनादेशाचा मी गैरवापर केला आहे. आरोपीने मला दिलेल्या नोटीस मधील मजकुर मला मान्य नसल्याबाबतचा लेखी खुलासा मी आज पर्यत आरोपीला दिलेला नाही. हे म्हणने खरे नाही की, आरोपीने त्याचे नोटीस उत्तरामध्ये नमुद केलेला व्यवहार हा खरा असल्यामुळे मी त्याला उत्तर दिलेले नाही. हे म्हणने खरे नाही की, आरोपीमध्ये व माझयामध्ये आजपर्यंत कोणताही व्यवहार झालेला नाही. हे म्हणने खरे नाही की, आजपर्यंत मला माझे स्वत:चे उत्पन्न नाही. हे म्हणने खरे नाही की, सन २०१५ पासून ते आज पर्यंत माझी एकरकमी ६,००,०००/- रुपये देण्याची आर्थिक परीस्थीती नव्हती व नाही. हे म्हणने खरे नाही की, मी धनादेशाचा गैरवापर करुन आरोपी विरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणने खरे आहे की, धनादेश नि. क्रं. ४५ मधील मजकुर, तारीख व रक्कम ही काळया शाहीच्या पेनाने नमुद केलेली असुन त्यावरील सही ही निळया शाहीच्या पेनाने नमुद केलेला आहे. हे म्हणने खरे आहे की, धनादेशावरील सही व इतर मजकुर वेगवेगळया हस्ताक्षरात लिहीलेला आहे. हे म्हणने खरे नाही की, आरोपीकडुन बेकायेदीशीर मार्गाने रक्कम उकलण्यासाठी मी आज खोटी साक्ष दिली.

**उलटतपास संपला.**
**फेर तपास काही नाही.**

समक्ष

स्वाक्षरी/-

**(अतुल उ.मोटे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
(न्यायालय क्र-२), मलकापूर
**दि.२९/०१/२०२६**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरी/-

**(अतुल उ.मोटे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
(न्यायालय क्र-२), मलकापूर